भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील “शाखा अभियंता” संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमित बदल्या- २०१८

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन आदेश क्रमांकः आपना-०२१८/प्र.क्र.१६३/पापु-१५

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल, नवीन मंत्रालय इमारत,
क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

तारीख: ३१ मे, २०१८

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील “शाखा अभियंता” संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत असून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	शाखा अभियंता यांचे नाव	सध्याचे कार्यालय	बदलीनंतरचे कार्यालय
१	२	३	४
१	श्री. विजय अर्जुनराव तावरे	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, पुणे.	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, अहमदनगर.
२	श्री. निलेश शिवाजी राजे	संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, पुणे.
३	श्री.नागेश माधवराव जगताप	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, अहमदनगर.	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, पुणे.
४	श्री. संजय काळू सुकटे	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, जळगाव	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, अहमदनगर.
५	श्री.परशुराम भिकाजी जाधव	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, सांगली.	वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालय, सातारा.

बदली आदेशाची तात्काळ व कार्यक्षमरित्या अंमलबजावणी होण्याकरीता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :-

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व कार्यालय प्रमुखांनी पर्यायी अधिकारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या अधिकाऱ्यांना दिनांक ३१ मे, २०१८ (म.न.) पर्यंत कार्यमुक्त करावे.

२. बदली झालेले अधिकारी त्यांच्या संबंधित कार्यालयातून कार्यमुक्त होऊन रूजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रूजू करून घ्यावे. एखाद्या अधिकाऱ्याला रूजू करून न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षाधीन काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित कार्यालय प्रमुखास व आस्थापना अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल.

३. सदरहू आदेशान्वये पदस्थापना करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास अथवा बदली आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात त्याची नोंद घेण्यात यावी. तसेच सदर कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक ३ (तीन) व नियम क्रमांक २३ चा भंग करणारी असल्यामुळे असे अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील.

४. सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे दिनांक ३१ मे, २०१८ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाने काढावे. दि. १ जून, २०१८ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपुर्वीच्या कार्यालयाकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित अधिकारी बदलीच्या कार्यालयात हजर झाल्यानंतर बदली नंतरच्या कार्यालयाने काढावे व तसा अहवाल शासनास सादर करावा. दि. १ जून, २०१८ पासूनचे वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल, अशा सूचना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुखांना देण्यात येत आहेत.

बदली झालेल्या अधिकाऱ्यांना दिनांक ३१/०५/२०१८ (म.न.) पर्यंत कार्यमुक्त न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून एकतर्फी कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील. बदली झालेल्या संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून ते बदली झालेल्या कार्यालयात रूजू झाले आहेत किंवा कसे, याची माहिती तात्काळ शासनास सादर करण्याबाबत संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना सूचित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 201805311826440928 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Laxman Mohandule

Digitally signed by Ramesh Laxman Mohandule
DN: CN = Ramesh Laxman Mohandule, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2018.05.31 18:52:18 +05'30'

(रमेश मोहंडुळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व संबंधित शाखा अभियंता, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.

प्रत-

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, शिवाजीनगर, पुणे
५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नागपूर, अमरावती, औरंगाबाद,नाशिक, पुणे, कोकण.
६. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
७. जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित सर्व जिल्हे.
८. निवडनस्ती कार्यासन, पापु-१५